शहराच्या मध्यवर्ती भागात
नवीन फ्लॅट्स विकणे आहे

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७

एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

मंगल कार्यालय

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.
सौभाग्य मंगल कार्यालय
आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २४७ वा | मंगळवार, दि. १३ मे २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही

## न्यूक्लिअर ब्लॅकमेल सहन करणार नाही - पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही. आता पाकिस्तानशी चर्चा होणार असेल तर ती फक्त दहशतवाद आणि पीओकेवरच होणार, असं देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले आहेत. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित केलं.

आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, 'ज्या पद्धतीने पाकिस्तानी सैन्य आणि सरकार दहशतवादाला प्रोत्साहन देत आहे, त्यामुळे एक दिवस ते पाकिस्तानलाच नष्ट करेल. जर पाकिस्तानला टिकून राहायचे असेल तर त्याला त्यांच्या देशातील दहशतवादी पायाभूत सुविधा नष्ट करावे लागतील, याशिवाय शांततेचा दुसरा कोणताही मार्ग नाही. हिंदुस्थानचा दृष्टिकोन अगदी स्पष्ट आहे. दहशतवाद आणि चर्चा एकत्र होऊ शकत नाहीत. दहशतवाद आणि व्यापार सोबत होऊ शकत नाहीत. पाणी आणि रक्त देखील एकत्र वाहू शकत नाहीत. मी जागतिक समुदायाला देखील सांगू इच्छितो की, आमचे धोरण स्पष्ट आहे की, जर पाकिस्तानशी कोणतीही चर्चा झाली तर ती फक्त दहशतवादावरच असेल. जर काही चर्चा झाली तर ती फक्त पीओकेवरच असेल.'

पंतप्रधान मोदी म्हणाले की, 'गेल्या काही दिवसांत, आपण देशाची ताकद आणि संयम दोन्ही पाहिले आहे. सर्वप्रथम मी प्रत्येक हिंदुस्थानींच्या वतीने हिंदुस्थानच्या बलाढ्य सैन्याला, सशस्त्र दलांना, आपल्या गुप्तचर संस्थांना आणि शास्त्रज्ञांना सलाम करतो. आपल्या शूर सैनिकांनी ऑपरेशनची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रचंड धैर्य दाखवले. आज मी त्यांचे शौर्य, धाडस आणि शौर्य आपल्या देशातील प्रत्येक आई, बहीण आणि मुलीला समर्पित करतो.'

ते म्हणाले, '22 एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी दाखवलेल्या क्रूरतेने देश आणि जगाला धक्का बसला होता. कुटुंब आणि मुलांसमोर सुट्टी साजरी करणाऱ्या निष्पाप लोकांची क्रूर हत्या ही दहशतीचा एक अतिशय भयानक चेहरा आहे. देशाची सुसंवाद तोडण्याचा हा एक घृणास्पद प्रयत्न होता. माझ्यासाठी वैयक्तिकरित्या, हे दुःख प्रचंड मोठे होते.'

पंतप्रधान मोदी म्हणाले, 'या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण राष्ट्र, प्रत्येक नागरिक, प्रत्येक समाज, प्रत्येक वर्ग, प्रत्येक राजकीय पक्ष दहशतवादाविरुद्ध कठोर कारवाई करण्यासाठी एका सुरात उभा राहिला. आम्ही हिंदुस्थानी सैन्याला दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले. आज प्रत्येक दहशतवादी संघटनेला माहित आहे की, आपल्या बहिणी आणि मुलींच्या कपाळावरील कुंकू पुसण्याचा परिणाम काय होतो.'

## सर्व चळवळीमध्ये समन्वय ठेवण्याची मराठा सेवा संघाची भूमिका

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** समन्वयाच्या अभावामुळे चळवळीमध्ये फूट पाडण्याचे काम केले जाते. परिवर्तनाची ताकद ही संघटित ताकद आहे. सर्वच बहुजन चळवळींनी एकत्र येण्याची गरज आहे. या सर्व चळवळींमध्ये समन्वय ठेवण्याची मराठा सेवा संघाची भूमिका असल्याचे मत चंद्रपूरचे डॉ. दिलीप चौधरी यांनी व्यक्त केले.

स्मृतीभवन शंकरनगर अकलूज येथे मराठा सेवा संघाच्यावतीने आयोजित केलेल्या महाअधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या सत्रात बहुजन चळवळींचा समन्वय, आवश्यकता आणि कृती कार्यक्रम या विषयावर ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी अमरावतीचे अरविंद गावंडे, मौलाना आझाद वि.म प्रदेश उपाध्यक्ष हसीब नदाफ, जो. शा. बा. संघटना अध्यक्ष युवराज पवार, बुद्धिस्ट जिल्हाध्यक्ष तुकाराम बनसोडे यांनीही या चर्चासत्रात सहभाग घेतला.

यावेळी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर, प्रदेशाध्यक्ष डॉ. विजय घोगरे, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, अर्जुन तनपुरे, राज्य उपाध्यक्ष अरविंद गवंडे, मधुकर मेहकरे, प्रा. आरती पवार यांच्यासह राज्यातून आलेले सेवा संघाचे पदाधिकारी, प्रमुख, मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना दिलीप चौधरी म्हणाले की, जाती जातीत फूट पाडण्यासाठी शेजारील राष्ट्राने हल्ले केले. परंतु, आपला देश एकसंघ राहिला, हे सर्वांचे यश आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून महात्मा गांधींपर्यंत सर्वांनीच बहुजनांना एकत्र करून चळवळी उभारल्या व त्यात यश प्राप्त केल्याचे दिसते. चळवळी केवळ भावनिक होऊन नव्हे तर व्यवहारिक पद्धतीने चालवल्या पाहिजेत. तुमचे आमचे ध्येय हे मानवी उन्नतीसाठी असेल तर यामध्ये समन्वय ठेवणे गरजेचे आहे. आधुनिक तंत्रज्ञान व संसाधने हे कधीच समाजाच्या विनाशासाठी नसतात. परंतु त्याचा वापर योग्य ठिकाणी व योग्य गोष्टीसाठी झाला पाहिजे. आजही बहुजनांना संघर्ष का करावा लागतो, यावर विचारमंथन व्हायला पाहिजे, असेही दिलीप चौधरी म्हणाले.

या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी असणारे नागपूरचे डॉ. नंदकुमार राऊत म्हणाले, आपल्या तरुणांनी देशाबरोबर परदेशात ही कार्यरत राहावे. भगवानराव वाघोले यांनी आपला कार्य व शेतीतील संधी स्पष्ट केली. यावेळी प्रदीप एकतपुरे उपस्थित होते. (पान 2 वर..)




**संधीचे सोने करण्याचे आवाहन**

आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि मराठा सेवा संघ या विषयावर संघाचे संस्थापक सचिव निर्मलकुमार देशमुख यांनी परदेशात असणाऱ्या विविध विभागातील संधीचे विश्लेषण केले. शेती, औद्योगीकरण, पर्यटन, आधुनिक तंत्रज्ञान यामध्ये कोणत्या देशात कशी संधी उपलब्ध आहे, याचे स्पष्टीकरण केले. तरुणांनी अभ्यास करून या संधीचे सोने करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

## आतापासूनच बेरजेचे राजकारण सुरु
## उमेदवारी देताना रुसवे फुगवे वाढणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेल्या तीन वर्षापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घ्या, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिल्याने जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीसाठी करमाळा तालुक्यात आतापासूनच बेरजेचे राजकारण सुरू झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

करमाळा तालुक्यात आमदार नारायण पाटील यांची पंचायत समितीवर निर्विवाद सत्ता होती. नारायण पाटील यांच्याकडे दहापैकी सात तर माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्याकडे सदस्य व बागल गटाकडे दोन सदस्य होते. करमाळा नगरपालिकेवर गेल्या चार टर्मपासून जयवंतराव जगताप यांच्याकडे सत्ता असून गतपंचवार्षिक निवडणुकीत जगताप गटाने बागल गटाशी युती करून निवडणुका जिंकल्या होत्या. नगराध्यक्षांच्या थेट निवडणुकीत माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे चिरंजीव वैभवराजे जगताप नगराध्यक्ष म्हणून विजयी झालेले होते; परंतु निवडणुका झाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांतच जगताप व बागल यांची युती तुटली व विरोधात निवडणूक लढवलेल्या सावंत गटाने जगताप गटाबरोबर दोस्ताना करून संपूर्ण पाच वर्षे सत्तेत सहभाग नोंदवला, तर सत्तास्थानी असलेल्या बागल गटाला विरोधी पक्षाची भूमिका पार पाडावी लागली.



नागरिक संघटना विरोधात होती.

करमाळा मतदारसंघात आमदार नारायण पाटील यांच्यासोबत असलेले माजी आमदार जयवंतराव जगताप व सावंत गट यांनी जिल्हा परिषद पंचायत समितीसह नगरपालिका निवडणुकीसाठी जळवाजळवा सुरू केलेली आहे. पंचायत समिती व नगरपालिकेवर आपल्या गटाचा झेंडा फडकवण्यासाठी रणनीती आखायला सुरुवात केलेली आहे. विधानसभा निवडणूक व आदिनाथ कारखान्याच्या निवडणूक प्रचारादरम्यान नेत्यांनी अनेकांना शब्द दिला आहे. त्यामुळे अनेकांचे रुसवे फुगवे उमेदवारी देताना काढावे लागणार आहेत.

**इच्छुकांची गर्दी..**

पांडे जि.प. गटातून दादा जाधव, संतोष पाटील, संतोष वारे, वीट गटातून पंचायत समिती रावगाव सुजीत बागल, किरण फुंदे, युवराज कपाट पांडेकर, विनय ननावरे, शीतल क्षीरसागर, पोत्रे, सुनील सावंत, राहुल सावंत, संतोष वारे, देवानंद बागल, डॉ. अमोल घाडगे, चिकलठाण गटातून विकास गलांडे, चंद्रकांत सरडे जेऊर गणातून अतुल पाटील, पृथ्वीराज पाटील, अतुल मस्कर, सतीश नीळ, कोर्टी गटातून सविता राजेभोसले, सुभाष गुळवे इच्छुक आहेत.

करमाळा नगरपालिकेत पूर्वी १७ प्रभाग होते या निवडणुकीत २० प्रभाग केले आहेत. जिल्हा परिषदेत पूर्वी पाच गट होते. आता नव्याने चिकलठाण हा नवीन गट वाढल्याने जिल्हा परिषदेचे सहा गट झाले आहेत. पंचायत समितीत १० गण होते. आता नव्याने पंचायत समितीमध्ये दोन गण वाढल्याने १२ गण झाले आहेत. पंचायत समितीमध्ये झाले आहेत.


**संजयमामा शिंदे, बागल गटाची भूमिका महत्त्वाची..**

विधानसभा व आदिनाथ कारखान्याच्या निवडणुकीत आमदार नारायण पाटलांना जयवंतराव जगताप व सावंत गट यांनी पाठिंबा दिलेला होता, तर आदिनाथ कारखान्यामध्ये बागल गटाने नारायण पाटलांना छुपा पाठिंबा दिलेला होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बागल कोणती भूमिका घेणार यावर बरेच काही अवलंबून आहे. माजी आमदार संजयमामा शिंदे यांची 'एकला चलो रे'ची भूमिका कायम असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढविण्याची तयारी संजयमामा शिंदे यांनी चालवलेली आहे. प्रा. रामदास झोळ गट निवडणूक रिंगणात उतरण्याची भाषा बोलू लागला आहे.

## बोगस शिक्षकांबरोबरच संस्थाचालकांच्या मनमानीला चाप बसणार!

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** शिक्षण विभागाने राज्यात मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे नियमबाह्य आणि बोगस शिक्षकांबरोबरच, संस्थाचालकांच्या मनमानीला देखील चाप बसणार आहे.

शिक्षण विभागाने संचमान्यतेनुसार शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांची मॅपिंग प्रक्रिया सुरू केली आहे. तसा आदेशच काढला आहे. या आदेशामुळे राज्यातील शिक्षण विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे.



शिक्षण विभागाने घेतलेल्या या निर्णयानुसार राज्यातील सरकारी, अनुदानित शाळांतील लाखो शिक्षक (Teacher) आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांचे प्रथमच मॅपिंग होणार आहे. वेतन आणि मंजूर पदे याबाबत शिस्त लावण्यासाठी शिक्षण विभागाने हे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. संचमान्यतेनुसार मंजूर पदे आणि वेतनासंबंधीची माहिती जूनपर्यंत एकत्र केली जाणार आहे. ही माहिती न भरणाऱ्या शिक्षकांना वेतनाला मुकावे लागणार असल्याचा सज्जड इशाराच दिला आहे.

शिक्षण विभागाने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांची मॅपिंग प्रक्रियेची जबाबदारी संबंधित शाळा (School) आणि मुख्याध्यापकांवर निश्चित केली आहे. यासाठी नॅशनल इन्फॉर्मेशन सेंटर (एनआयसी)च्या संचमान्यता 'एपीआय'चा (प्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस) वापर करण्यात येणार आहे. शालार्थ (पान 2 वर..)

**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

मो: ९४२२६५११०१

## दहावीचा निकाल आज होणार जाहीर

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून (MSBSHSE) घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर होणार आहे. उद्या दुपारी 1 वाजता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर हा निकाल पाहता येईल.
https://results.digilocker.gov.in
https://sscresult.mahahsscboard.in
http://sscresult.mkcl.org
https://results.targetpublications.org



अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ.अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )
२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

## देशातल्या नागरिकांना पडलेले प्रश्न:

1. दहशतवादी पहलगाममध्ये कसे आणि कुठून आले?

2. गुप्तचर संस्थांकडे intelligence होता का? त्यांनी तो सरकारला दिला होता का?

3. गुप्तचर संस्थांनाही या कटाचा पत्ता लागला नसेल तर या अपयशासाठी जिम्मेदार कोण?

4. जर सरकारला सूचना मिळाली असेल तर सरकारनः सुरक्षा यंत्रणा एवढी गाफील कशी राहू दिली? याची जबाबदारी कोणाची?

5. निघृण हल्ल्यानंतर दहशतवादी सुरक्षित पळून कसे गेले? त्यांना पकडण्याची जिम्मेदारी कोणाची?

6. आपण फक्त दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले पण नंतर पाकनं स्वतः होऊन कुरापत काढली. हे माहित असूनही पाकला एवढा आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळालाच कसा? आपले राजदूत काय करत होते?

7. भारताची लाल आंखवाली जगप्रसिद्ध डिप्लोमसी नेमकी याच वेळी कुठे गेली? एकही देश आपल्या बाजूनं का उभा राहिला नाही? हे अपयश जयशंकर यांचं की मोदींचं?

8. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांशी मोदींची घनिष्ठ मैत्री असूनही युद्ध सुरू होताच आम्ही कोणाचीच बाजू घेणार नाही असं स्टेटमेंट अमेरिकेनं का दिलं?

9. आपली बाजू लखलखीत असूनही आपल्या एकाही मित्रराष्ट्रानं खुलेपणानं पाठिंबा का दिला नाही?

10. तटस्थ असलेली अमेरिका दुसऱ्याच दिवशी अचानक सक्रीय का झाली?

11. दोन्ही पक्षांनी वाटाघाटी केल्या असा दावा अमेरिकी उपराष्ट्राध्यक्षांनी केला आहे. वाटाघाटी कोणत्या मुद्द्यांवर आणि कुठे झाल्या?

12. वाटाघाटीत काय देवाणघेवाण झाली? भारतानं युद्धबंदी सोडून काय मिळवलं? दहशतवादी मिळाले का? कुलभूषण जाधव यांच्यासारख्या एखाद्या तरी राजकिय बंदीवानाची सुटका झाली का? वाटाघाटीचा वृतांत सरकार लोकांना कधी सांगणार?



13. युद्ध सुरू होताच सरकारनं सर्वपक्षीय बैठक घेतली तशी युद्ध अमेरिकेकडून संपवतांना का घेतली नाही? विरोधी पक्षाला विश्वासात का घेतलं नाही?

14. विरोधी पक्ष विशेष संसद अधिवेशनाची सतत मागणी करत असतांना सरकार अधिवेशन का घेत नाही?

15. सर्वपक्षीय बैठकीला पंतप्रधान का हजर रहात नाहीत? त्यांना बिहारची निवडणुक देशाच्या सुरक्षेपेक्षा मोठी वाटते का?

16. अमेरिकेनं मध्यस्थी आपल्या किंवा पाकिस्तानच्या विनंतीवरून केली की स्वतः होऊन?

17. दोन्ही देशात युद्धबंदी झाल्याची घोषणा सरकारच्या आधी अमेरिकेनं का केली? सरकारच्या सार्वभौम अधिकारांवरचं हे अतिक्रमण सरकारनं का सहन केलं.

18. अमेरिकेला त्यात काय मिळाले? आपल्याला काय मिळाले? एका उद्योगपतीची अमेरिकेतली शिक्षा रद्द व्हावी म्हणून तडजोड झाली असा दावा काही लोक करत आहेत. त्यात तथ्य आहे का हे सरकार का सांगत नाही?

19. युद्धबंदी करत आहोत याची कल्पना अमेरिकेचं ट्वीट येण्याआधी आपल्या सेनादलाच्या प्रमुखांना, संसदेला, विरोधी पक्षांना दिली होती का?

20. भारतानं अमेरिकेची मध्यस्थी काश्मिर प्रश्नावर मान्य केली आहे का?

21. पाकिस्तानशी वाटाघाटी नाही असं सरकार म्हणते आणि काश्मिर प्रश्नी उभयतांशी आम्ही बोलू असं अमेरिका म्हणते. याचा अर्थ काय?

आणि सर्वात महत्वाचं म्हणजे या प्रश्नांची उत्तरं भारताच्या नागरिकांनी कोणाकडे मागायची? भारताचं सरकार की दुसऱ्या कोणत्या देशाचं सरकार?

**साभार: जेष्ठ विचारवंत डॉ. विश्वंभर चौधरी, यांच्या फेसबुक खात्यावरून**

सायं दैनिक सोलापूर www.katusatya.in
कटूसत्य katusatya@gmail.com
मुख्य कार्यालय
संपादक पांडूरंग हरिदास सुरवसे
उपसंपादक सचिन मोहन जाधव
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

**आपणही होवू शकता ''मुक्त पत्रकार''**

नमस्कार....,

आपणही ''मुक्त पत्रकार'' होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक ''मुक्त पत्रकार'' होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक ''कटूसत्य'' या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि ''मुक्त पत्रकार'' होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये ''मुक्त पत्रकार'' म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) ''मुक्त पत्रकार'' मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर ''मुक्त पत्रकार'' म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती ''मुक्त पत्रकार'' म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे ''मुक्त पत्रकार'' झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच ''मुक्त पत्रकार'' होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू
सपादक दै.सा.कटूसत्य

टिपः- ''कटूसत्य'' व ''वृत्तदर्पण'' या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.

## संपादकीय

# पाकिस्तान असं का वागतो?

पाकिस्तानावर भारताने प्रतिहल्ले सुरू केल्यामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांत आता युद्धाच्या कथा चर्चिल्या जात आहेत. 22 एप्रिल रोजी पाकिस्तानची मदत असलेल्या दहशतवाद्यांनी पहलगाम येथे पर्यटकांवर केलेल्या भाड हल्ल्यामुळे पाकिस्तानची अब्रू गेलेली आहे. भारताचे दहशतवादाबद्दलचे धोरण म्हणजे 'शून्य सहनशीलता'. त्यामुळे भारत लवकरच पाकिस्तानात दडलेल्या दहशतवाद्यांवर कारवाई करेल, याचा जगाला अंदाज होताच. अशा अनेक घटना या आधीसुद्धा अनेकदा घडलेल्या आहेत. जनरल असिम मुनिर 2022 सालापासून पाकिस्तानचे लष्कर प्रमुखपदी आहेत. त्यांनी अलीकडेच स्वतःला मुदतवाढ दिली आहे. त्यांच्या आधीचे लष्करप्रमुख जनरल बावेजा यांना आर्थिक विकास महत्त्वाचा वाटत होता. त्यानुसार त्यांनी काही कौतुकास्पद धोरणं राबवली होती. आता असिम मुनिर पुन्हा एकदा गौरवशाली भूतकाळाचा उल्लेख करत आहेत. याचा नेमका परिणाम समजून घेतला पाहिजे. 2019 साली जे पुलवामा हल्ला झाला होता तेव्हा हेच मुनिर पाकिस्तानची गुप्तचर सेवा आयएसआयचे प्रमुख होते. त्यांनीच त्या भ्याड हल्ल्याला हिरवा कंदील दाखवला होता. तेव्हासुद्धा काही अभ्यासकांनी मुनिर यांच्याबद्दल चिंता व्यक्त केली होतीच. आता ती शंका खरी ठरली आहे.

पाकिस्तानची ही मानसिकता आजची नाही. याची मूळं भारताच्या आधुनिक इतिहासात सापडतात. याचा अगदी अलीकडे पाकिस्तानचे आताचे लष्करप्रमुख असिम मुनिर यांनी काही बाबींचा उच्चार केला होता. ते म्हणाले की, पाकिस्तानच्या नागरिकांनी पाकिस्तान का निर्माण करावा लागला, हे कधीही विसरू नये. या संदर्भात त्यांनी जिना यांनी मांडलेल्या 'द्विराष्ट्र' सिद्धांताचा उल्लेख केला. त्यांच्या मते, पाकिस्तान हे दुसरे असे राष्ट्र आहे जे 'कलमा'वर आधारलेले आहे. पहिले राष्ट्र इस्लामचे संस्थापक मोहम्मद पैगंबर यांनी 'मदिना'त स्थापन केले होते. त्यानंतर सुमारे तेराशे वर्षांनंतर 1947 साली कलमावर आधारित पाकिस्तानची निर्मिती झाली.

आता प्रा. वेकंट धुलिपाला यांच्या सारखे अभ्यासक दाखवून देतात की जिना यांच्या 'द्विराष्ट्र' सिद्धांतामागे हीच दृष्टी होती. म्हणून मुस्लीम लीगने मार्च 1940 मध्ये 'स्वतंत्र पाकिस्तान'ची मागणी केली आणि ऑगस्ट 1947 मध्ये पाकिस्तानची निर्मिती झाली. या मागील गुंतागुंतीचा इतिहास समजून घेतला नाही तर 1947 सालापासून पाकिस्तानचे विविध राष्ट्रप्रमुख जनरल आयुबखान, झुल्फिखार अली भुट्टो, जनरल झिया आणि जनरल परवेझ मुशर्रफ वगैरे नेत्यांची धोरणं समजणार नाही. यासाठी इस्लामचा इतिहास अगदी थोडक्यात माहिती असणे गरजेचे आहे. सातव्या शतकात उमग पावलेल्या इस्लाम धमार्ने लवकरच झेप घेतली आणि युरोप, अआशियातील बरेच प्रदेश पादाक्रांत केले. तो इस्लामच्या वैभवाचा काळ होता. आशियात युरोपियनांच्या आगमनानंतर मात्र इस्लामची पीछेहाट सुरू झाली आणि शेवटी 1857 च्या बंडात पराभव झाल्यानंतर मोगलांची सत्ता संपुष्टात आली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला झालेल्या पहिल्या महायुद्धानंतर केमालपाशा यांनी तुर्कस्तानातील खिलाफत नष्ट केली. अशा रीतीने आधुनिक काळात जागतिक पातळीवर मुस्लीम समाजाला र्‍हास बघावा लागला.

यावर उपाय म्हणून 'पाकिस्तानची निर्मिती' या घटनेकडे बघितले पाहिजे, अशीसुद्धा मांडणी केली जाते. पाकिस्तान हा फक्त मुस्लिमांसाठी निर्माण झालेला देश म्हणजे 'दुसरी मदिना' असं मानले जातं. पाकिस्तानच्या मागणीतील भौगोलिकतेचा मुद्दासुद्धा दुर्लक्ष करण्यासारखा नाही. आज जो भूप्रदेश 'पाकिस्तान' म्हणून ओळखला जातो त्याच्या सर्व शेजारी देश इस्लाम धर्मीय आहेत. अशा देशांच्या मदतीने पाकिस्तान एक 'बलशाली राष्ट्रं बनेल असा विश्वास जिन्हा यांना होता.

आता या स्थितीची दुसरी बाजू समोर ठेवली पाहिजे. ती म्हणजे फाळणीपूर्व भारतात मुस्लिमांची लोकसंख्या सुमारे नऊ कोटी होती. पाकिस्तान निर्माण झाला असता तर यातील सहा कोटी पाकिस्तानात गेले असते. याचा दुसरा अर्थ असा की उरलेल्या भारतात तीन कोटी मुसलमान राहिले असते. हे सर्व पाकिस्तानात गेले नाही. अशा मुस्लिमांच्या सुरक्षेसाठी जिना 'ओलीस' हा मुद्दा समोर आणत असत. भारतातील अल्पसंख्याक मुस्लिमांना जर बहुसंख्याक हिंदूंनी त्रास दिला तर पाकिस्तानातल्या अल्पसंख्याक हिंदूंना असाच त्रास होईल. हीच ती 'ओलीस रणनीती'.

असं दिसतं की जिना सुरुवातीला धर्मनिरपेक्षतावादी होते. मात्र, पाकिस्तानच्या निर्मितीसाठी त्यांनी धर्मगुरूंची मदत घेतली. 1940 च्या दशकात जिना आणि देवबंदी पंथीय धर्मगुरू यांच्यातील घसट वाढली होती. यातूनच पाकिस्तान हा इस्लामिक स्टेट असेल, हे नक्की होत गेले. तेव्हाचे देवबंदी पंथाचे मोठे धर्मगुरू मौलाना शब्बिर अहमद उस्मानी यांनी तर जाहीर केले होते की पाकिस्तान म्हणजे 'नवीन मदिना' असेल.

मदिनाचे राज्य स्थापन झाल्यावर तेव्हा जसा इस्लामचा प्रभाव वाढला तसा आता पाकिस्तान निर्माण झाल्यावर होईल असा त्यांचा विश्वास होता. यातील पुढचा टप्पा म्हणजे सर्व मुस्लीम देशांत एकीची भावना निर्माण होईल. मुस्लीम लीगच्या नेत्यांना असेही वाटत होते की आधुनिक जगाला भेडसावर्णाअया सर्व प्रश्नांची उत्तरं इस्लामकडे आहेत. यातून एक महत्त्वाची घटना घडली. 1949 साली भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनात संमत झालेल्या ठरावानुसार पाकिस्तानात 'सर्वोच्चस्थानी अल्ला, नंतर शासन आणि त्यानंतर समाज' अशी उतरंड असेल.

हे सर्व तपशील काळजीपूर्वक बघितले की पाकिस्तानच्या निर्मितीपासून आजपर्यंत पाकिस्तानच्या महत्त्वाच्या सर्व नेत्यांच्या घोषणा, त्यांचे कार्यक्रम, त्यांनी राबवलेल्या योजना वगैरेंवर प्रकाश पडतो. 1965 साली भारतावर युद्ध लादणारे पाकिस्तानचे तेव्हाचे सर्वेसर्वा जनरल आयुबखान तर म्हणायचे की 'मी सकाळची न्याहरी लाहोरमध्ये करेन, दुपारचे जेवण जालंधरला घेईन आणि रात्रीचं जेवण दिल्लीत'. इतका त्यांना भारतावर सहज विजय मिळवण्याबद्दल विश्वास होता. प्रत्यक्ष काय झाले हा इतिहास इथे देण्याची गरज नाही.

'नवीन मदिना' निर्माण करणं, भारताबद्दलचा हा राग, जगावर प्रभाव टाकण्याची मानसिकता ही विसाव्या शतकातील पाकिस्तानच्या निर्मितीमागची महत्त्वाची प्रेरणा होती. या संदर्भात पाकिस्तानचे आजचे सर्वेसर्वा जनरल असीम मुनिर यांच्या वक्तव्यांकडे बघितले पाहिजे.

ते सेनाधिकारी आहेत, राजकीय नेते नाहीत वगैरे समर्थन लंगडे पडते. याचे कारण 2018 साली इमरान खान यांनीसुद्धा निवडणुकीदरम्यान पाकिस्तान म्हणजे 'नवीन मदिना', असे जाहीर केले होते, हे लक्षात घेतले पाहिजे. हे सर्व समजून घेतले की असं वाटतं की एखाद्या देशाला, एखाद्या समाजाला गौरवशाली इतिहास असणं धोक्याचं आहे की काय? अशामुळे तो देश आधुनिक काळातील आव्हानांना वस्तुनिष्ठपणे सामोरा जायला तयार नसतो की काय?

## प्रबोधन

# याचकपणा सोडा! देणे हाच धर्म। घेणे हा अधर्म

भिक्षापात्र अवलंबणे। जळो जिणे लाजिरवाणे॥ फुकटचं अन्न खाण्याचा तिरस्कार संत तुकोबांनी एका अभंगातून असा व्यक्त केला आहे. तुकोबा हे उच्च संस्काराचे एक श्रेष्ठ आणि ज्येष्ठ उदाहरण होते. जे कोणी भीक मागून जगा असा आचारधर्म आपल्या अनुयायांना, शिष्यांना, चेल्यांना देतात, ते अधःपतितच होते आणि आहेत. पण आश्चर्य असं की, बहुतेक सर्व धर्मांनी आपल्या सांप्रदायिकांना विनासंकोच भीक मागायला आणि फुकटचं खायला भाग पाडलं आहे. तशी घाणेरडी सवय लावली आहे. ॐ भिक्षां देहि, जय जय रघुवीर समर्थ, अलख निरंजन, धर्म कोरान्न भिक्षा, ॐ श्री गुरुदेव दत्त या किंवा अशा आरोळ्या ठोकत धार्मिकपणाला साद घालत झोळीधारी महापुरुष दारात आले, की माणसं अगत्यपूर्वक त्याला भीक- नव्हे; भिक्षादान- करतात. प्रसाद म्हणून दिला- घेतला जाणारा 'भंडारा'ही असाच असतो. भुकेलेल्याला अन्न द्या म्हणणारे गाडगेबाबा स्वतः सूर्योदयापासून बारा वाजेपर्यंत सहा तास खराटा घेऊन सफाईचं काम मन लावून करीत. मग कष्टाची भाकरी हातावर घेऊन दोन घास पोटात ढकलीत असत. तेही तुकोबांचे खरे अनुयायीच होते. भीक मागणं त्यांना तत्त्वतः मान्य नव्हतंच. पण अनेक धर्मांनी भिकेला प्रतिष्ठा देण्यासाठी अनेक दंतकथांची निर्मिती केली आहे. कोल्हापूर परिसरात बारा वाजता दत्त भिक्षा मागण्यासाठी येतात असं पुराणात लिहिलं आहे. त्यामुळे त्या वेळेस कुणीही भिकारी दारी आला, की लोक त्याला आदराने भीक घालतात. अत्रीपुत्र दत्त कधी काळी होऊन गेलाही असेल आणि तोही एकमुखी असेल, असं समजू या. पण आज तो येणं शक्य नाही, हे वास्तव भिक्षा देणाऱ्यांना समजत नाही. परिणामी, पुराणकथांमुळे भिकाऱ्यांचा प्रश्न हा राष्ट्रापुढील एक भयानक प्रश्नच झाला आहे. तुकोबा स्वाभिमानी होते. ते फुकटखाऊ संस्कृतीचे निंदक होते. तोच संप्रदाय गाडगेबाबांनी चालवला.

तरीही फुकटचं खायला सोकावलेले, फुकटचं खाऊन मस्तवाल झालेले आणि फुकटचं खाणं हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे, असं मानणारे कितीतरी भिकारड्या मनोवृत्तीचे लोक समाजात आहेत. आम्ही काय कुणाचे खातो रे। तो राम आम्हाला देतो रे॥ असा हलकट मग्रूरपणा फुकटच्या खाण्यातून दृढ होत जातो. सरकारी, निमसरकारी कचेरीतील अधिकारी, विभागप्रमुख वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस रात्रीचं जेवण बाहेरच हादडत असतात. तेही दुसऱ्या कुणाच्या तरी पैशानी! थ्री स्टार, फाईव्ह स्टार हॉटेलांपुढे भारत सरकार, महाराष्ट्र शासन, जिल्हा निबंधक, महापौर, उपमहापौर, विरोधी पक्षनेता, प्रेस अशी बिरुदं मिरवणाऱ्या गाड्या सायंकाळी साडेसात ते रात्री बारापर्यंत उभ्या असतात. त्या हॉटेलात हे उच्चभ्रू खात-पीत आणि फुकटच्या खाण्याच्या आंतरिक आनंदाने सभा लावीत असतात.

अशांच्याकडे समाजाने जर हेटाळणीच्या नजरेने पाहिलं असतं, तर किमान त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का तरी बसला असता. पण असं होत नाही. कारण समाजाने 'जो तो आपल्या नशिबात असेल ते खातो. आमच्या नशिबात ते नाही; मग तळमळून काही होणार नाही,' असा पारंपरिक विचित्र, कर्मफल-सिद्धान्त, पूर्वपुण्य इत्यादी विकृत विचार स्वीकारला आहे. त्यामुळे चिडण्याशिवाय काही होताना दिसत नाही. भ्रष्टाचारात आपल्या देशाचा वरचा नंबर लागण्याचंही कारण हे भाग्यवादी विचारच आहेत. साखरेचं खाणार त्याला देव देणार अशा म्हणी आपल्या ओठांवर सतत नाचत असतात. त्यामुळे आपल्या देशातून भ्रष्टाचार निपटून काढण्याप्रमाणेच फुकटखाऊपणाला आळा घालणंही कठीण आहे. पण त्याबाबतच्या चिडीचा विचार असा अभंग हवा-


घरातील अन्न। खातो स्वाभिमानी
खरा तो सद्गुणी । सज्जन तो ॥ १
परान्नाची इच्छा । करिती भिकारी
वृत्ती कुत्र्यापरी । अपेक्षेची ॥२
भीक मागायला । लावणारा धर्म
खरा तो अधर्म । धर्म नव्हे ॥ ३
मंदिरी वर्गणी । भक्त आणताती
प्रसाद वाटती । भीक तीच ॥४
प्रसाद हे नाव । मूर्ख देती त्यास
भिकेच्या अन्नास । गौरविती ॥५
फेका तो प्रसाद । शिकवी लाचारी
हात जो पसरी । भिकारी तो ॥६
घेणाऱ्याचा हात । असतो खालती
तीच अधोगती। जीवनाची ॥७
'देणाऱ्याचा हात'। सुद्धा घेऊ नये
काही मागू नये। शहाण्याने ॥ ८
देणे हाच धर्म । घेणे हा अधर्म
आनंदाचे मर्म। 'देणे' हेच ! ।।९
कमाईचे खाती। सुपुत्र देशाचे
खाती फुकटचे । देशद्रोही ॥ १०



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# पर्यटनाला ब्रेक, का राज्यांतर्गत फिरतीला संधी...!

नुकत्याच झालेल्या पेहेलगाम मधील पर्यटकांवर हल्ल्यामुळे पर्यटन क्षेत्र हादरून निघाले आहे. एक भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पर्यटन क्षेत्रावर मोठे संकट येऊन ठेपले आहे का? असे वाटत आहे. खूपशा पर्यटकांनी स्वर्ग असलेले काश्मीर मधून आपले बुकिंग रद्द केले आहे. याचा मोठा फटका तिथल्या स्थानिकांना आणि पर्यटनाची जोडलेल्या लोकांना होणार आहे, यात काही वाद नाही. आणि येणारे पुढील संकट स्थानिकांसाठी आव्हान घेऊन येणार आहे, असे इथे अंदाज वर्तवले जात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर एप्रिल, मे आणि जून या महिन्यात सुट्ट्या असतात त्याचा पुरेपूर फायदा पर्यटन क्षेत्राला होत असतो खरा पण या हल्ल्यामुळे सर्व ठिकाणी जाणे लोक टाळत आहेत असे लक्षात येत आहे. हा हल्ला कारणास्तव असला तरी राज्यातून दुसऱ्या राज्यात जाताना सुद्धा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, कारण परप्रांतीय पर-राज्यातले लोक आल्यानंतर त्यांच्याशी गैरव्यवहार करणे किंवा हल्ला करणे किंवा चोरी, लूट करण्याच्या उद्देशाने आणि पैसा उकळण्याच्या भानगडीमुळे पर्यटन क्षेत्र बदनाम होत चालले आहे. अशातच सुरक्षित वातावरण निर्माण करणे गरजेचे वाटत आहे. खरंतर सर्वतोपरी समृद्ध असलेला भारत देशामध्ये बघण्यासारखं खूप आहेगा परंतु आता परदेशी नागरिक यायचं प्रमाण कमी झाले आहे. कारण गैरवर्तन आणि गैरप्रकार हे वाढत चालले आहेत, हे दुर्दैवी आहे. सांगताना खंत वाटते पण परदेशी नागरिक भारताकडे पाठ फिरवली आहे. तुटपुंज असे संख्या असलेले परदेशी पाहुणे आपल्याला दिसतात. त्याचप्रमाणे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाणं सुद्धा आज अवघड झाले आहे स्थानिक प्रशासन कुठल्याही गैरव्यवहारात गैरप्रकार हस्तक्षेप न करता पर्यटकाला सुरक्षा देत नाहीयेत. यामुळे सततची हल्ले व्हिडिओ च्या मार्फत सोशल मीडियावर दिसत आहेत. याचा दूरगामी परिणाम होणार आहे, हे स्थानिकांना कळतच नाहीये. अर्थव्यवस्था फिरणार नाही, स्थानिकांना रोजगार मिळणार नाही, पर्यटनावर अवलंबून असलेल्या लोकांना आणि उद्योगधंद्यांना व्यापाराला ब्रेक लागणार आहे. रेल्वे, रस्ते, बस, टॅक्सी यासारख्या दळणवळणाच्या साधनावर परिणाम होणार आहे. कमी बुकिंगमुळे टूर्स अँड ट्रॅव्हल एजन्सी हेच हे नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे हॉटेल उद्योगाचेही नुकसान भरमसाठ होताना दिसत आहे. त्याचप्रमाणे स्थानिक दुकाने आणि त्यातून खरेदी करणारे वस्तूंची विक्रीही कमी होईल असे असताना या पर्यटन क्षेत्रावर नजर हटवणे कितपत परवडणार आहे, हे सर्वांनीच विचार करावा. मात्र नक्की आहे पण यातून एक संधी आपण शोधली पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्रातील भटकंती वाढवावी जेणेकरून राज्यांतर्गत पर्यटनाला चांगली चालना मिळेल. स्थानिक प्रशासनाने पर्यटनाला सुरक्षित आणि सोयीस्कर सोयी दिल्या तर महाराष्ट्रातील लोक महाराष्ट्रातच भटकंती करतील महाराष्ट्रातील संस्कृती खूप समृद्ध आहे, आणि त्याचा अभ्यास आणि उपभोग घ्यायची संधी आता आली आहे. त्यामुळे परराज्यात जाण्यापेक्षा आपल्याच राज्यातील काही ठिकाणी पाहण्याची आणि स्थानिकांना पर्यटनामार्फत कमवून देण्याची संधी आपण देऊ शकतो. त्यामुळे राज्यातला पैसा राज्यातच राहील आणि स्थानिकांना समृद्धी मिळेल आणि भरभराट होईल. अशातच जर महाराष्ट्रातील विविध ठिकाणी पाहिली किंवा अगदी आनंद घेतला तरी चालेल परंतु असुरक्षित परराज्य प्रदेश टाळावा असे ते आवाहन करण्यात येत आहे. खरंतर ही संधी चालून आली आहे महाराष्ट्र समृद्ध करण्याची ही संधी आहे, आपल्या इथे समुद्रकिनारे आहेत, ऐतिहासिक किल्ले आहेत, धार्मिक स्थळे, मंदिरे आहेत, त्याचप्रमाणे तलाव, नद्या, चांगले राहण्याची ठिकाणे व छान जेवणाची ठिकाण पण आहेत, थंड हवेची ठिकाणे आहेत, शास्त्र आणि इतिहासाने समृद्ध अशा गोष्टींचा अभ्यास करून किंवा अगदी आनंद घेऊन आपण पर्यटन करू शकतो. अगदी खूप पैसा खर्च करून असुरक्षित ठिकाणी जाण्यापेक्षा महाराष्ट्रातच आपलेपणाने आपल्या लोकांची भरभराट करावी असे वाटते. मला माहित आहे काही लोकांना देशांतर्गत आणि प्रदेशात जायला आवडते, परंतु आत्ताच्या काळामध्ये असुरक्षित वातावरण आणि धोका मग तो कोणत्याही प्रकारचा असो हे टाळण्यासाठी सुरक्षित पर्यटन करणे गरजेचे आहे. स्थानिक पर्यटनाशी जोडलेल्या लोकांनी सुद्धा आलेल्या लोकांना पर्यटकांना, प्रवाशांना सुरक्षा देणे हे पहिले प्राधान्य असले पाहिजे आणि मग त्यानंतर आदरातीथ्या आणि आपलेपणा यातील आपलेसे करणे आणि पर्यटकांना मनमोकळेपणाने राहायचे सोयीस्कर करणे, याला प्राधान्य दिले पाहिजे. सध्या काही लोकांकडे पैसा असून सुद्धा पर्यटनाला जाणे भीतीदायक वाटत आहे. त्यामुळे प्रत्येक भटकंती करणाऱ्यांनी स्वतःची काळजी घेत फिरावे, असे आव्हान होत आहे. शेवटी स्वतःची जबाबदारी स्वतःवरच आहे. पर्यटकांनी सुरक्षित जागा बघूनच जावे आणि आपले व आपल्या कुटुंब आणि मित्र मैत्रिणी तसेच इतरांचे सुद्धा जागृत राहून संरक्षण करावे, असे इथे वाटते. एकंदरीतच राज्यांतर्गत पर्यटनाला मोठी संधी चालून आली आहे, कारण देशांतर्गत आणि परदेशी जाणारे लोक आता स्थानिक जागी जायला तयार आहेत. याचा पूर्ण फायदा पर्यटनाशी जोडलेल्या लोकांनी घ्यावा. नवीन संधी उपलब्ध करून द्यावी आणि राज्याचे अर्थव्यवस्था तसेच पर्यटन धोरण बळकट करावे, असे सर्वांनाच वाटत आहे. त्यामुळे घरातून बाहेर पडताना सुरक्षित आणि मनोरंजनात्मक प्रवास करावा आणि आपल्या घरी आपले कोणीतरी वाट पाहत आहे आणि आपल्याला परत यायचं आहे या उद्देशानेच पर्यटन करावे अशी इथे इच्छा व्यक्त करतो. सुरक्षित पर्यटनाच्या शुभेच्छा आणि मनोरंजनात्मक सुट्टीची सर्वांनी मजा घ्यावी एवढेच वाटते, धन्यवाद.



ऋत्विज चव्हाण
मो 8380800083/
9527377555

## प्रबोधन

# आदर्श नेता । हा भेटे कल्पनेत

यथा राजा तथा प्रजा असं राजेशाहीतील समाजाचं वर्णन एकेकाळी केलं जात होतं आणि दुर्दैवाने एकविसाव्या शतकातसुद्धा लोकमानसात राजांविषयीचे प्रेम घट्ट मूळ धरून बसलेलं दिसून येतं. तथापि सुदैवाने जगात अनेक राष्ट्रांत लोकशाही प्रतिष्ठित होऊन नांदत असल्याने यथा प्रजा तथा नेता असा बदल करण्यासारखं वातावरण तयार होत आहे. पूर्वी राजांची एकाधिकारशाही चालायची; आता नेत्यांची बेबंदशाही चालू आहे. शासक बदलले, पण कारभाराचा अव्यवस्थितपणा, दिशाहीन धोरणांचा नंगानाच, चालबाजीने मतपेट्यांच्या जुगाराचा डाव जिंकून सत्तेला पायाची दासी करण्याचा नेत्यांचा उन्मत्तपणा राजेशाहीलाही लाजवील असा देशभर दिसत आहे. 'राजनीती वारांगनेप्रमाणे अनेक रूपं धारण करते,' असं विचारवंत भर्तृहरी का म्हणतात, ते वरील चित्र पाहिल्यावर कळायला हरकत नाही. लोकशक्ती प्रगत राष्ट्रांची असो वा अप्रगत राष्ट्रांची; ती आंधळी असल्यासारखीच वागते आणि तिला नेता आवश्यकच वाटतो. नेतृत्वविहीन शासन अस्तित्वात येण्याइतकी प्रगती प्रगत राष्ट्रांचीही का होत नाही, हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. कसाही (की कसायी?) असला तरी चालेल, पण नेता पाहिजेच! अशी आजच्या जगाची मानसिकता आहे. विचारवंत श्रद्धानंद म्हणतात, 'नेता बुडवो की तारो; पण लोक मात्र नेत्याच्या मागूनच चालतात. भारत हा तर वैचारिक पातळीच्या दृष्टीने मागासलेला देशच असल्याने त्याच्या नेतृत्वाच्या दर्जाबद्दल न बोलणं बरं! पण अतिप्रगत राष्ट्रांचे नेते सत्तेचा समतोल, महासत्तापदाची लज्जास्पद लालसा आणि धोकेबाज राजकारणाची बुमरँगफेक अशा गोष्टींच्या नादी लागून आपल्या देशाला विनाशाच्या खाईत कसं लोटीत आहेत, हे उदाहरणांसह आणि तपशीलवार सांगणं अवघड नाही. लोकांना नेता आवश्यक वाटतो हीच खरी अडचण आहे. 'सरकार कोणाचंही असो ते एकसारखंच असतं, सत्ता सर्वांनाच भ्रष्ट करते,' हे अटलबिहारी वाजपेयींचं निरीक्षण हे केवळ आत्मपरीक्षण नसून जगाच्या शासनव्यवस्थांचं कठोर समीक्षण आहे.

भारतीय लोकशाही हा तर विचारवंतांना अनेक शतकं चिंतनाचं खाद्य पुरवील, असा अनाकलनीय प्रकार आहे. भारतातील आजच्या महाधूर्त नेत्यांनी राजकारण हा फायद्याचा धंदा म्हणूनच त्यात स्वतःला झोकून दिलं आहे. सरदार पटेल यांनी नेत्याविषयी आपल्या अपेक्षा व्यक्त करताना म्हटलं होतं, 'थोडे भाषण करता आलं, थोडं वृत्तपत्रात लिहिता आलं म्हणजे कुणी नेता होत नाही. नेता होणं हा क्रमिक विकास असतो.' पण आपल्या इथे लोकशक्तीने भाषण, लेखनाचा गंधही नसला; तरी नेता होता येतं, हे अनेक उदाहरणांनी सिद्ध करून दाखवलं आहे. चांगली बौद्धिक क्षमता असणारी माणसं राजनीतीच्या वारांगनेपासून कटाक्षाने दूर राहून स्वतःचं कल्याण साधतात.

'स्वतःला काहीही माहीत नसताना, आपणाला सर्व काही समजते, असं मानणं हा राजकारणातील फार मोठा गुण(?) आहे,' असं नाटककार बर्नार्ड शॉ म्हणतात. ते इंग्लंडमधील राजकारण्यांना काही टक्के लागू होत असेल; तर भारतीय राजकारण्यांना शंभर टक्के लागू व्हायला हरकत नाही. महात्मा गांधी, पंडित नेहरू, डॉ.राजेंद्रप्रसाद, डॉ. अबुल कलाम आजाद, डॉ. राधाकृष्णन, डॉ. जाकीर हुसेन. डॉ.आंबेडकर, डॉ.अब्दुल कलाम अशी गुणवत्तेची व्यासंगी राजकारणी माणसं आज फार दुर्मीळ झाली आहेत. पण आजचे जे नेते आपले गौरवग्रंथ समारंभपूर्वक प्रकाशित करतात; त्या नेत्यांची योग्यता गौरवग्रंथात लेख लिहिणाऱ्या विद्वानाइतकीही नसावी, हे देशाचं दुर्दैव नव्हे?

'आत्मविश्वास, दृढता आणि वैराग्य हे तीन गुण ज्या व्यक्तीमध्ये असतात, तोच नेता होण्यास योग्य असतो,' असं एक संस्कृत सुभाषित म्हणते. या कसोटीवर श्रीमान योगी छत्रपती शिवराय आणि 'योगी राजकारणी' महात्मा गांधी, पंडित नेहरू यांचा उल्लेख करता येईल. पण ती कसोटी आजच्या धनाढ्य आणि निर्बुद्ध नेत्यांना लावता येईल का? 'पद सोडल्यावरही ज्याची योग्यता कमी होत नाही, तो खरा नेता' असा एक सुविचार आहे. जनतेने अशा नेत्याचा शोध घेऊन त्याचं सामर्थ्य वाढवलं, तर देशाचा भविष्यकाळ उजळतो. देवाधमार्चं नाव घेऊन जे मतांचा जोगवा मागतात, त्यांना लोकांनी मंदिराचं पुजारीपण बहाल करावं, प्रधानमंत्रीपद नव्हे! म्हणूनच निवडणूक ही मतदारांच्या शहाणपणाची परीक्षा असते. सत्यान्वेषी पत्रकार खुशवंतसिंग मतदारांच्या ह्या अवघड कामगिरीविषयी म्हणाले होते, 'मतदारांना चोरांमधून सज्जन शोधावा लागतो.' हा केवळ विनोद नव्हे; तर ते तर्ककठोर सत्य आहे, एवढं भान मतदारांनी ठेवलं पाहिजे. कारण-

कोणी एक नेता। अन्य अनुयायी
लोकशाहीठायी । नाही योग्य ॥ १
स्वयंशासनाचा। करावा विकास
मिळो प्रत्येकास । अधिकार ॥२
तेव्हा दुःखितांचे । संकट जाईल
लोक पाहतील। सुखी जग ॥ ३
आपला लगाम । नेत्याहाती दिला
माकडाची कळा । लोका आली ॥४
आदर्श नेता । हा भेटे कल्पनेत
भेटे वास्तवात । नको तोचि ॥५
स्वतःचा उद्धार । स्वतःच करावा
कशासाठी हवा । ढोंगी नेता॥६
निवडून द्यावे । असे फार थोडे
तांदळात खडे । तसे अन्य ॥७
दुर्दैवी सौभाग्य। तशी लोकशाही
आहे आणि नाही। सारखीच ॥८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

# सर्व चळवळीमध्ये...

इतिहासाचार्य मा. म. देशमुख बहुजन इतिहास व प्रबोधनाचे अध्वर्यू या विषयावर प्रा. प्रेमकुमार बोके यांनी विचार व्यक्त केले. यावेळी अध्यक्षस्थानी मधुकरराव मेहकरे होते. प्रा. विद्या पंडित, कॉ. शरद पाटील यांची इतिहास मीमांसा आणि मार्क्स, फुले, आंबेडकरवाद या विषयावर प्रदेश कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे व कॉ. किशोर ढमाले यांनी मनोगत व्यक्त केले.

सकाळच्या सत्रात सूर्योदयाच्या कविता या कवी संमेलनात मनीषा पाटील हेरोलीकर, कवी संमेलनाचे उद्घाटक डॉ सतीश तराळ, डॉ. सतीश होनगावे जालना, लक्ष्मण हेंबाडे पंढरपूर, मनीषा पाटील, रायजादे सांगली, दिनेश भिसे, परभणी, बालाजी जाधव लातूर, तानाजीराजे जाधव, शाहीर पाटील सांगली, दुर्गा देशमुख परभणी, राजेश महल्ले अमरावती, सुभाष पांचाळ,रवींद्र कदम परभणी, गोरखनाथ भागपाडे, कमलाकर दुबे, राजवर्धन कदम आदींनी सहभाग नोंदवला.

# बोगस शिक्षकांबरोबरच संस्थाचालकांच्या...

प्रणालीचे अद्ययावतीकरण करून संचमान्यतेतील उच्चतम मान्य शिक्षक व शिक्षकेतर पदांसाठी वेतन काढले जाणार आहे. या प्रणालीत नसलेल्या शिक्षकांचे वेतन रोखले जाणार आहे. या आदेशामुळे शिक्षकांमध्ये खळबळ उडाली आहे.

राज्यातील शाळांना मे महिन्याची सुटी आहे. या कालावधीतच ही माहिती भरली जाणार असून, त्यानंतर जूनचे वेतन या नवीन प्रणालीद्वारे काढले जाणार आहे. यासंदर्भातील सूचना आणि आदेश राज्यातील सर्व शाळा आणि मुख्याध्यापकांना देण्यात आल्या आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सहसंचालक डॉ. श्रीराम पानझाडे यांनी या माहितीला दुजोरा दिला. संचमान्यता आणि शालार्थ प्रणालीमार्फत शिक्षकांना वेतन अदा केले जाते. अनेकदा ताळमेळ नसल्याने काही खासगी संस्थाचालक बोगस माहिती आणि पदे मंजूर नसलेल्या शिक्षक, शिक्षकेतरांची अधिकची नावे सादर करत होते. ही नावे शाळांकडून ऑफलाइन पद्धतीने कागदावर सादर केली जात होती. त्यात अनेकदा पदे कमी अथवा जास्त होण्याचे प्रकार निदर्शनास आले होते. या प्रकाराला यामुळे चाप बसेल, यामुळे ही मॅपिंग पद्धत वापरली जात आहे.

# दत्तकला रेडिओ स्टेशनचे थाटात उद्घाटन



करमाळा : (कटुसत्य वृत्त):- शैक्षणिक प्रचार व प्रसार, कृषिविषयक स्थानिक संवाद, सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि माहिती प्रचार यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत दत्तकला इंजिनिअरिंग महाविद्यालयाने 'दत्तकला रेडिओ'ची सुरुवात केली आहे. त्याचे उद्घाटन नुकतेच झाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सायन्स व टेक्नॉलॉजीचे डीन डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, सचिवा माया झोळ, सीईओ डॉ. विशाल बाबर, प्राचार्य डॉ. एस. ए. पाटील, डॉ. उषादेवी पाटील आदी उपस्थित होते.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. झोळ यांच्या कल्पनेतून सुरू केलेल्या या रेडिओ स्टेशनचे प्रक्षेपण हे इंटरनेटद्वारे करण्यात आले आहे. सदरचे केंद्र २४ तास सुरू असून, जगामध्ये इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी हे केंद्र ऐकता येणार आहे.

हे केंद्र सुरू करण्यासाठी दत्तकला इंजिनिअरिंगच्या अकॅडमिक डीन प्रा. शीतल धायगुडे. समन्वयक प्रा. पल्लवी सूळ व कॉम्प्युटर विभागाचे प्रमुख डॉ. सचिन बेरे यांचा मोलाचा वाटा आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ संलग्नीकरण असलेल्या महाविद्यालयामधील हे पहिलेच केंद्र आहे. हा प्रकल्प स्थानिक जनतेच्या विकासास चालना देणारा ठरावा, अशी अपेक्षा यावेळी दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिवा माया झोळ यांनी व्यक्त केली.

## वात्रटिका

### निर्लज्य क्रिकेटपटू

परवा नव्हती,काल नव्हती
आणि तशीच आज नाही...
आपण काय बोलतोय
याची त्याला लाज नाही...
युद्ध जणू तो क्रिकेटचा
खेळ समजू लागला...
नाक कापले तरीही तो
अकलेचे तारे तोडू लागला...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोलापूरच्या सिध्देश्वर तलावातील ५५ कासवे मृत्युमुखी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या सिद्धेश्वर तलावातील जलप्रदूषण वरचेवर वाढत असताना आता याच तलावात एकाच वेळी ५५ कासवांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

गेल्या आठवड्यात या तलावातील हजारो मासे मृत्युमुखी पडले होते. तलावाचे पर्यावरण राखण्यासाठी एकीकडे कोट्यवधी रुपयांचा खर्च होत असताना दुसरीकडे एकाच वेळी ५५ कासवांचा मृत्यू झाल्यामुळे हा चर्चेचा विषय ठरला आहे.

वन विभागाने वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार अज्ञात व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. राज्यात प्रथमच एकाचवेळी ५५ कासवांचा मृत्यू होण्याची ही पहिलीच घटना समजली जात असून ही बाब जैवविविधता संवर्धन आणि संरक्षण कायद्यानुसार गंभीर मानली जाते. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जिल्हा प्रशासन काय भूमिका घेते, याकडे पर्यावरण व पशुपक्षिप्रेमींचे लक्ष वेधले आहे.

गेल्या आठवड्यात या तलावात एकाच वेळी हजारो मासे मृत्युमुखी पडले होते. वाढते जलप्रदूषण आणि कमी झालेल्या प्राणवायुमुळे मासे मृत्युमुखी पडल्याचे बोलले जात असताना त्यावर सिध्देश्वर देवस्थान समिती किंवा प्रशासकीय पातळीवर कोणतीही कार्यवाही झाली नाही. यातच आता या तलावात एकाचवेळी ५५ कासवे मृत्युमुखी पडल्याचे दिसून आले आहे. सर्व मृत कासवे सडलेल्या अवस्थेत आढळून आली. शवविच्छेदन झाल्यानंतर सर्व मृत कासवांचे विजापूर रस्त्यावरील सिध्देश्वर वन विहारात दहन करण्यात आले. यात चार कासव विदेशी प्रजातींची होती. 'अमेरिकेन रेड इयर स्लाइडर' या नावाचे हे कासव नागरिकही पाळतात. त्यापैकी कोणी तरी नागरिकांनी हे कासव सिध्देश्वर तलावात आणून सोडले असावे, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. उर्वरित सर्व कासवे चिखल जातीची आहेत. त्यांना इंग्रजीत 'एशियाटिक फ्लॅपशेल टर्टल' या नावाने ओळखले जाते. हे कासव चिखलातही तोंडावाटे प्राणवायू घेऊन जगू शकते.

### वन विभागाकडून अज्ञातांविरुध्द गुन्हा दाखल



अभ्यासकांच्या म्हणण्यानुसार हे कासव उभयचर असून चिखलात, दूषित पाण्यात, पाण्याबाहेर आणि जमिनीवरही प्राणवायू घेऊन जगू शकतात. परंतु मागील आठवड्यात तलावात मृत्युमुखी पडलेले, कुजलेले आणि सडलेले मासे खाल्ल्याने विषबाधेतून कासवांना मरण आले असावे, असा प्राथमिक कयास व्यक्त केला जात आहे. ज्येष्ठ पक्षी आणि पर्यावरण तज्ज्ञ डॉ. अरविंद कुंभार यांनी या शक्यतेला पुष्टी दिली आहे. तलावात पुरेसा प्राणवायू आणि अन्नही मिळत नसल्यामुळे तसेच विषबाधित मासे सेवन केल्यामुळे कासवांचा मृत्यू झाला असावा, असा अभिप्राय डॉ. कुंभार यांनी वर्तविला आहे. मात्र अंतिम निष्कर्ष शवविच्छेदन अहवालातूनच काढता येईल, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, सिध्देश्वर तलावात एकाचवेळी ५५ कासवे मृत्युमुखी पडल्याच्या घटनेची दखल घेऊन वन विभागाने वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार अज्ञात व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. याशिवाय वन विभागाने तीन सदस्यीय चौकशी समितीही गठित केली आहे. या समितीच्या अहवालानुसार पुढील कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### कासवांचे शवविच्छेदन

दरम्यान, सिद्धेश्वर तलावात मृत्युमुखी पडलेल्या ५५ पैकी प्रातिनिधिक स्वरूपात पाच कासवांचे शवविच्छेदन शासकीय पशुचिकित्सा रुग्णालयात करण्यात आले. मात्र कासवांच्या मृत्यूचे निश्चित कारण लगेचच देण्यात आले नाही. मृत कासवांच्या शरीरातील काही विशिष्ट नमुने (व्हिसेरा) काढून पुण्यातील राष्ट्रीय विषाणू प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. तथापि, तलावातील दूषित पाणी हे कासवांच्या मृत्यूचे कारण असू शकते, असा प्राथमिक अभिप्राय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी वर्तविला आहे.

# लक्ष्मीकृष्ण पतसंस्थेच्या चेअरमनपदी पाटील तर व्हा.चेअरमनपदी लोणारी यांची निवड

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** येथील कै समाजरत्न राजेंद्र भाऊ पाटील यांच्या आशिवार्दाने लक्ष्मीकृष्ण ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेच्या चेअरमनपदी ज्ञानराज पाटील तर व्हा.चेअरमनपदी सूनिल लोणारी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सदर निवड ही निवडणूक निर्णय अधिकारी सम्राट पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पतसंस्थेच्या कार्यालयात झाली.



यावेळी सर्व संचालकांच्यावतीने नूतन चेअरमन व व्हा चेअरमन यांचा सन्मान करण्यात आला. या सर्वसाधारण सभेस चेअरमन ज्ञानराज पाटील, व्हा.चेअरमन सूनिल लोणारी, नूतन संचालक संजय गांधी, संदिप ठोंबरे, राजेंद्र पांढरे, पंकज पिसे, सिकंदर काझी, जितेंद्र पलंगे, बाबाराजे बोडरे, सिमा टेंबरे, रूपाली भिसे, निवडणूक निर्णय अधिकारी सम्राट पाटील, सचिव उमेश बरडकर क्लार्क ओंकार पदमन आदि मान्यवर तसेच लक्ष्मीकृष्ण ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर, अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील दोघे जण गंभीर जखमी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर आज सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास पल्सर मोटारसायकल वरून पुण्याहून सोलापूरच्या दिशेने जाताना भिगवणमध्ये संगम वाईन्सच्या समोर दुचाकी वरील असणाऱ्या जोडप्याला अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने दुचाकीवरील जोडपे गंभीर जखमी झाले आहे.

दीपक सूर्यवंशी (राहणार लातूर) अंकिता घोडके (राहणार हैदराबाद) अशी जखमींची नावे आहेत.

अपघात स्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, सदरील जोडपे हे पुण्याकडून सोलापूरच्या दिशेने आपल्या ताब्यातील पल्सर (गाडी क्र माहीत नाही) या वाहनावरून निघाले होते. भिगवणमध्ये संगम वाईन्सच्या समोर आले असता अज्ञात चार चाकी वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. धडक दिल्यानंतर सदरील वाहन घटनास्थळावरुन तसेच वेगाने निघून पुढे गेले.

अपघात घडल्यानंतर मोटरसायकल वरील दोघेही गंभीर जखमी होऊन जागीच बेशुद्ध पडलेले होते. याची माहिती आपुलकीची सेवा ॲम्बुलन्सचे मालक केतन वाघ यांना दिली असता तात्काळ घटनास्थळी जाऊन आपल्या ॲम्बुलन्स मधून दोन्ही जखमींना लाईफ लाईन हॉस्पिटलमध्ये दाखल केले. येथे त्यांच्यावर पुढील उपचार सुरू होते.

अपघातातील जखमींची नावे दीपक सूर्यवंशी (राहणार लातूर) अंकिता घोडके (राहणार हैदराबाद) अशी असून दोघांची प्रकृती गंभीर असून नातेवाईकांना संपर्क करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यामुळे ग्रामीण भागाचे चित्र पालटले - आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजातील मुलां मुलींच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. स्वावलंबी शिक्षणाचा मंत्र दिला. कमवा व शिका योजना कार्यान्वित केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले. त्यातून ग्रामीण भागातील जनजीवनाचे चित्र पालटले. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राची निर्मिती झाली असे प्रतिपादन सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी व्यक्त केले.



सोलापूर महानगरपालिका व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, रावजी सखाराम हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज, प्राथमिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 66 व्या पुण्यतिथीनिमित्त सम्राट चौकातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, प्रभारी कुलसचिव डॉ अतुल लकडे,मनपा उपायुक्त तैमूर मुलाणी, आनंद चंदनशिवे, उद्योजक केतनभाई शहा, लक्ष्मी उद्योग समूहाच्या सौ माधुरी पाटील, प्रख्यात करसल्लागार धीरज जवळकर, राजकीय विश्लेषक डॉ श्रीकांत येळेगावकर, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे,ओम प्रकाश वाघमारे, अंत्रोळीकर, डॉ अस्मिता बालगावकर, मुख्याध्यापीका काशीबाई पुजारी, मुख्याध्यापक संजय जोशी, वसंत नागणे, इतिहास संशोधक नितीन अणवेकर, प्रा उत्तमराव हुंडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे डॉ सचिन ओम्बासे म्हणाले की कर्मवीरांनी आपल्या संस्थेच्या वस्तीगृहात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची निवासाची व भोजनाची व्यवस्था केली. कठीण प्रसंगी वस्तीगृहातील मुलांच्या भोजन खचार्साठी त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई पाटील यांनी आपल्या गळ्यातील मंगळसूत्र देखील मोडले. दोघांनीही त्यागाचा आदर्श घालून दिला. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष वालवडकर यांनी केले सूत्रसंचलन वंदना डांगे यांनी केले तर आभार अमर देशमुख यांनी मानले. कार्यक्रम प्रसंगी योगासन राष्ट्रीय खेळाडू जानवी चंदनशिवे व तायक्वांदो खेळाडू दिव्या कोणे व प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला.

**कर्मवीरच आधुनिक भगीरथ- डॉ श्रीकांत अंधारे**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाच्या झोपडीपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचविली. त्यामुळे गरीब मुला मुलींना शिक्षण मिळाले. महाराष्ट्रात सामाजिक व शैक्षणिक क्रांती झाली. म्हणून वंचित व उपेक्षित घटकांना शिक्षणाची द्वारे खुली करणारे ते आधुनिक भगीरथ आहेत. असे गौरवोद्गार परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांनी काढले.

# प्रतिभा पाटील हिने सहा. गटविकास अधिकारी पदास घातली गवसणी

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेतून अकोले-खुर्द (ता.माढा) येथील कु.प्रतिभा रामभाऊ पाटील हिने सहा.गटविकास अधिकारी पदास गवसणी घातली आहे.



कु.प्रतिभा पाटील हिने यापूर्वी एमपीएससी मधून विक्रीकर निरीक्षक हे पद मिळविले आहे. तिचे शिक्षण अकोले-खुर्द येथील बबनरावजी शिंदे विद्यालयात झाले असून तिने पुणे येथील फ्रर्ग्युसन कॉलेजमधून बीएस्सी पदवी मिळविली आहे. ती लहानपणापासूनच हुशार विद्यार्थिनी म्हणून परिचित होती. तिची मोठी बहीण ही यापूर्वीच एमपीएससी मधून पोलीस उपनिरीक्षक झालेली आहे.

तिच्या या यशाबद्दल माजी आ.बबनराव शिंदे, माजी आ.संजयमामा शिंदे, जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, एपीआय अंकुश चिंतामण, प्राचार्य राजेंद्र ठोंबरे, अकोले-खुर्द ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.


## Classified - छोटी जाहीरात

### विकणे आहे

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्‌ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


# रेल्वे प्रवासी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर



**सोलापूर, (कटुसत्य वृत्त):-** रेल्वेचा प्रवास हा सुरक्षित प्रवास म्हणून समजला जातो. त्यामुळे प्रवासी रेल्वेच्या प्रवासाला नेहमीच पसंती देतात. मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात गेल्या काहीदिवसांपासून धावत्या रेल्वेवर होत असलेल्या, दगडफेकीच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

शुक्रवारी रात्री मुंबई-हैदराबाद एक्स्प्रेसवर अज्ञातांनी केलेल्या दगडफेकीत तीन प्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

मुंबईहून निघालेली हैदराबाद एक्स्प्रेस ही गाडी जेऊर जवळील भाळवणीनजीक आली असता धावत्या रेल्वे गाडीवर अज्ञातांनी दगडफेक केली. या दगडफेकीत प्रवाशांच्या डोक्याला गंभीर जखम होऊन रक्तस्राव झाला. काही दिवसांपूर्वी टिकेकरवाडीजवळ धावत्या रेल्वेवर झालेल्या दगडफेकीत एका चिमुकलीचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच हा प्रकार घडला आहे. त्यामुळे रेल्वे प्रवाशांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे. याशिवाय रेल्वेतून प्रवास करताना दागिने व मोबाइल चोरीचे प्रमाण नित्याचे झाले आहे. या गंभीर प्रश्नाकडे रेल्वे प्रशासन व सुरक्षा बल यांच्याकडून दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. सोलापूर रेल्वे विभाग हा देशातील अत्यंत महत्त्वाचा विभाग समजला जातो. भारताच्या दक्षिणेला जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे सोलापूर रेल्वे स्थानक होय. भारत-पाकिस्तान यांच्यातील सीमेवरील युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर असताना प्रवाशांवर झालेली दगडफेक ही गंभीर बाब आहे. संवेदनशील ठिकाणांहून रेल्वेगाडी जात असताना सुरक्षा बलाच्या जवानांकडून देणाऱ्या सूचनांची अंमलबजावणी प्रवाशांकडूनही होणे गरजेचे आहे. सोलापूर रेल्वे विभागातून दक्षिणेतील बंगळुरू, हैदराबाद, चेन्नई, तिरुवअनंतपूरम तर उत्तरेकडील दिल्ली, जयपूर, लखनौ, पटना, मुंबई आदी महानगरांसाठी अनेक सुपरफास्ट एक्स्प्रेस धावतात. यातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे सोलापूर विभागातील सुरक्षा यंत्रणा अधिक दक्ष राहणे गरजेचे आहे.

# सुनील वाघमोडे यांना गुरुविद्या बसव शरण पुरस्कार

**मोहोळ / (कटुसत्य वृत्त):-** लांबोटी (ता. मोहोळ) येथील उद्योजक सुनील वाघमोडे यांच्या सामाजिक कायाचीं दखल घेऊन त्यांना बसव जयंती निमित्त गुरुविद्या प्रतिष्ठानकडून माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांच्या हस्ते 'गुरूविद्या बसव शरण दांपत्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

प्रत्येक वर्षी सामाजिक कार्यात उल्लेखनीय काम केलेल्या गुरुविद्या प्रतिष्ठानकडून गुरुविद्या बसव शरण दांपत्य पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यावेळी हा पुरस्कार लांबोटी येथील युवा उद्योजक सुनील वाघमोडे यांना माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, अध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) पोहणे २) हत उलट लिहा ३) ठाणे लगतचा नवीन जिल्हा ४)स्व. गानसम्राज्ञी-** मंगेशकर ५) पंधरा दिवसांचा कालावधी ६) सोने, सुवर्ण
७) सतत कार्यरत असणारा अगदी छोटा जीव
११) महिना
१३) ताकदवान
१४) कसलाही विचार न करता तातडीने घेतलेला निर्णय १६) राक्षस
१९) पटकन, लगेच २०) भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे नेते
२१) फ्ल्यू (मराठीत) २३) तुला पाहते मालिकेतील अभिनेता २७) मागील वेळी, दशा, अवस्था २८) उत्सवाचा दिवस ३०) सायकलचे लोखंडी चाक ३१) आपला देश ३३) मग्न, तर उलट लिहा
३५) दाक्षिणात्य अभिनेता-*** हसन
३८) दहा गुणिले दहा
४१) कोकणातील कृषी विद्यापीठ
४२) अभिनेता, बोल्टचा जोडीदार
४३) जुनाच्या विरूध्दार्थी
४४) फटाक्यांची माळ
४६) गाणे

**आडवे शब्द :** १) राष्ट्रवादी काँग्रेसचे एक नेते
५) बीडच्या नेत्या ८) नांगर (हिंदीत) ९) पैसा, संपत्ती १०) पर्वा, चिंता
१२) घड्याळ (हिंदीत) १३) उन्नती, भरभराट १५) रसभरीत, रसाने भरलेला
१७) त्वचेवरील बारीक केस १८) दुप्पट (इंग्रजीत)
२०) राजाचे मोठे घर २१) एखादा पदार्थ मनसोक्त खाणे-** मारणे
२२) पाण्याचे बाष्परूप २३) धान्य पाखडण्याचे साधन२४) तुरूंग (इंग्रजीत)
२५) बैलाच्या मानेवरील जोखड २६) टेकडी (हिंदीत)
२९) दुर्योधनाची आई ३१) वर्तविलेले भविष्य
३२) नदीवरील बंधारा ३४) एक रास ३६) इंग्रजी मुळाक्षरातील पहिले अक्षर
३७) शिजविलेला तांदूळ ३९) दोन (हिंदीत)
४०) निवडणुकीमध्ये उमेदवाराला मत देणे ४३) आकाश, गगन
४४) मनातील खंत, शल्य
४५) वेगळे झाल्यानंतर पतीने पत्नीला द्यावयाची रक्कम ४७) वडिलोपार्जित संपत्तीचा वारसाहक्काने मालक
४८) रामायणातील सुग्रीवाचा भाऊ

## सुडोकु - 247

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | 9 | | | 4 | 2 | |
| | 7 | 1 | | | 4 | 6 | 8 | |
| | | | 6 | | 7 | 9 | | |
| 3 | 4 | | | | 2 | | | 8 |
| 8 | | 6 | | 7 | | | | |
| | 9 | 2 | 5 | | | 7 | | |
| | | | | 2 | 6 | 3 | | 9 |
| 2 | 6 | | | 4 | 5 | | 7 | 1 |
| 7 | 3 | | 8 | | 1 | | 5 | |

# विद्यापीठाकडून पंतप्रधान मोदींना निमंत्रण !

## अहिल्यादेवींच्या स्मारकाच्या कामासाठी २५ मेपर्यंत डेडलाईन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीसमोरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून ३१ मे रोजी लोकार्पण करण्याचे नियोजित आहे.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठाकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने स्मारक परिसरातील काम पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला २५ मेपर्यंत डेडलाईन दिली आहे.

विद्यापीठाच्या नव्या प्रशासकीय इमारतीसमोरील पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या पुतळा परिसरात सध्या कोरीव काम सुरू आहे. त्यामागे मुंबई विद्यापीठाच्या धर्तीवर १५० फुटाचा (५० मीटर उंच) वॉच टॉवर उभारण्यात आला आहे. याशिवाय अहिल्यादेवींच्या कार्याची ओळख सर्वांना व्हावी म्हणून त्याठिकाणी विविध चित्रे देखील असणार आहेत. या कामासाठी १४ कोटींचा निधी मंजूर असून त्यापैकी साडेसहा ते सात कोटी निधी अजून आलेला नाही. ३१ मे जवळ येत असल्याने काम युद्धपातळीवर सुरू आहे, पण मुदतीत सर्व कामे होतील का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### दुसऱ्या रस्त्याचे काम वेळेत अपेक्षित

पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जयंतीनिमित्त ३१ मे रोजी विद्यापीठाकडून मोठा कार्यक्रम घेतला जाणार आहे. तत्पूर्वी, हिरज ते नवीन प्रशासकीय इमारत आणि सोलापूर-पुणे महामार्ग ते नवीन प्रशासकीय इमारतीपर्यंत रस्ता केला जाणार आहे. हिरज रस्ता ते नवीन प्रशासकीय इमारतीपर्यंतचा रस्ता जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून केला जाणार असून तसे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. दुसऱ्या रस्त्याचेही काम काही दिवसांत अपेक्षित आहे.

**- अतुल लकडे,** कुलसचिव,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

**रस्त्यासाठी लागू शकतो विलंब**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने हिरज रोडवरील ३८२ एकर जमिनीवर भव्य प्रशासकीय इमारत उभारली आहे. त्याच ठिकाणी परीक्षा भवन देखील असेल. आगामी शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाचे प्रशासकीय कामकाज तेथूनच सुरू होईल. तत्पूर्वी, ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जयंतीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमासाठी पंतप्रधानांना बोलावण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर त्याठिकाणी जाण्यासाठी दोन रस्ते प्रस्तावित असून त्यातील एका रस्त्याचा विषय मार्गी लागला, पण दुसऱ्या रस्त्याचा सर्व्हे अजून सुरू झालेला नाही. सर्व्हे होऊन जमीन संपादित करणे, त्यासाठी निधी मंजूर करून घेणे आणि रस्ता करणे, या कामांसाठी वेळ लागू शकतो, असे अधिकारी सांगत आहेत.

# जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश प्राप्त करता येते - खा. उदयनराजे भोसले

**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** सर्वसामान्य कुटुंबामध्ये जन्मलेल्या सुहास आदमाने यांनी अपार कष्टाच्या माध्यमातून शिरापूर सारख्या छोट्याशा खेडेगावांमध्ये 'स्पेन्का'ची निर्मिती केली. अवघ्या दहा वर्षांमध्ये चार राज्यात आपल्या कायार्चे जाळे विणले आहे. माणसाकडे जिद्द आणि चिकाटी असेल तर यश प्राप्त करता येते, हेच त्यांनी दाखवून दिले, असे प्रतिपादन खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांनी केले.



सात रस्ता येथील स्पेन्का कंपनीच्या नव्या कॉर्पोरेट कार्यालयाचे उद्घाटन खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या हस्ते संपन्न झाले. तद्नंतर हॉटेल बालाजी सरोवर येथे नव्या तंत्रज्ञानाच्या अल्कलाइन आयोनायझरचे उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले, कष्ट केलं तर चांगले दिवस येतात हे सुहास आदमाने आणि त्यांच्या टीमने कृतीतून दाखवून दिले आहे. मी आज या कार्यक्रमाला स्वादचा एक हितचिंतक आणि त्याच्या कुटुंबाचा एक घटक म्हणून आलो आहे.

अध्यक्षस्थानी प्रिसिजन कॅम्पशाफ्टसचे चेअरमन यतीन शहा हे होते. यावेळी 'स्पेन्का'चे व्यवस्थापकीय संचालक सुहास आदमाने, संचालिका अश्विनी आदमाने, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, माजी आमदार राजन पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शिवाजी सावंत, 'स्पेन्का'चे विलास आदमाने यांच्यासह भूषण चिंचोळे, गणेश वानकर, प्रकाश चवरे, दीपक माळी, बसवराज शास्त्री, अनिल कादे, रामदास चवरे, दत्तात्रय मुळे, विनोद भोसले, अशोक देवकते, संकेत ढवळे, सौदागर चव्हाण, शशिकांत धोत्रे आदींची उपस्थिती होती.

**'स्पेन्का'च्या कॉर्पोरेट कार्यालय, अल्कलाईन मशीनचे उद्घाटन**

उद्योजक दीपक जाधव यांनी प्रास्ताविक केले. तनिषा कदम यांनी स्पेन्का मिनरल वॉटर फिल्टरविषयी 'पीपीटी' द्वारे सादरीकरण करताना म्हणाल्या, गुणवत्ता, आपुलकीची सेवा आणि उत्तम व्यवस्थापनच्या माध्यमातून 'स्पेन्का'ने भारतातील एक नामांकित बँड म्हणून नावलौकिक प्राप्त केला. महाराष्ट्रसह कर्नाटक, तेलंगणा येथील ५ हजारांहून अधिक हॉटेल्स, रेस्टॉरंटस व लाखो ग्राहकांपर्यंत 'स्पेन्का' ब्रँड पोहोचला आहे.

**खा.उदयनराजे भोसले यांच्याकडून अनेक गोष्टी शिकलो**

'स्पेन्का'चे व्यवस्थापकीय संचालक सुहास आदमाने याप्रसंगी बोलताना म्हणाले, खासदार छत्रपती उदयनराजे भोसले महाराज यांच्याकडून मी अनेकानेक गोष्टी शिकलो-शिकत आहे. त्यांची विचार करण्याची पध्दत, निर्णय घेण्याची क्षमता ही वाखाणण्याजोगी आहे. त्यांच्याबद्दल बोलण्यासारखे खूप आहे. फक्त त्यांची साथ सदैव पाठिशी राहावी, इतकीच माफ अपेक्षा आहे. त्यांचा विश्वास कधीच तोडणार नाही.

# एनटीपीसी सोलापूरमध्ये 'बालिका सशक्तिकरण अभियान - 2025'चा भव्य शुभारंभ

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** एनटीपीसी सोलापूरमध्ये आज 'बालिका सशक्तिकरण अभियान (GEM)-2025' चा भव्य शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी सोलापूरच्या डीसीपी (क्राईम) सौ. दीपाली काले प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. उपस्थित पालकांना संबोधित करताना त्यांनी सांगितले की, "आपल्या मुली खूप नशिबवान आहेत ज्यांना या कार्यशाळेचा भाग होण्याची संधी मिळाली आहे. इथे शिकलेल्या गोष्टी त्या नियमित करत राहिल्या तर भविष्यात त्या आपले व आपल्या देशाचे नाव उज्वल करतील."



या कार्यक्रमासाठी एनटीपीसी सोलापूरचे कार्यकारी संचालक बी.जे.सी. शास्त्री, महाप्रबंधक (ऑपरेशन अँड मेंटेनन्स) एम. के. बेबी, सृजनात्मक महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती पद्मा शास्त्री व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कार्यकारी संचालक बी.जे.सी. शास्त्री यांनी सांगितले, "GEM हा केवळ एक कार्यक्रम नाही, तर हा एक संकल्प आहे झ मुलींना सक्षम बनवण्याचा, त्यांना पाठिंबा देण्याचा आणि त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचा. या मुली म्हणजे फक्त लहान मुले नाहीत, तर त्या आपल्या देशाचे उज्वल भविष्य आहेत."

'बालिका सशक्तिकरण अभियान (GEM)' ही एक चार आठवड्यांची निवासी उन्हाळी कार्यशाळा आहे. या कार्यशाळेत प्रकल्प प्रभावित गावातील 10 ते 12 वर्षे वयोगटातील, 5वी उत्तीर्ण मुलींची निवड केली जाते. कार्यशाळेत इंग्रजी, हिंदी, मराठी, गणित यासारख्या विषयांचे शिक्षण दिले जाते आणि कला, खेळ, योग याचा देखील समावेश असतो, जेणेकरून मुलींचा सर्वांगीण विकास साधता येईल.

या वर्षी अहेरवाडी, होटगी, होटगी स्टेशन व तिल्लेहाल गावांमधील एकूण 42 मुलींची निवड झाली आहे. त्यांना इंग्रजी, गणित, विज्ञान, योग, आत्मरक्षण, कला, संगीत आणि इतर सृजनशील कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाईल. त्यांना आरोग्य तपासणी, पोषक आहार, आवश्यक साहित्य, गणवेश व शैक्षणिक साधनांची सुविधा दिली जाईल.

कार्यक्रमाच्या शेवटी, चार सर्वोत्तम विद्यार्थिनींना एनटीपीसी टाउनशिप स्कूलमध्ये संपूर्ण शिष्यवृत्तीवर प्रवेश दिला जातो. हा उपक्रम केवळ शिक्षणापुरता मर्यादित नसून, आत्मविश्वास, नेतृत्व आणि समान संधी यासाठी एक मजबूत पाया घालतो.

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शांतता कमिटीची बैठक संपन्न

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८व्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरात मिरवणुका शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडाव्यात, यासाठी आज शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पोलिस प्रशासन व विविध मिरवणूक काढणाऱ्या मंडळांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. या वेळी पोलिस प्रशासनाने मंडळांच्या अडचणी जाणून घेतल्या असून, योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले. बैठकीस सोलापूर शहरातील वरिष्ठ पोलीस अधिकारी, छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाचे पदाधिकारी, विविध मंडळांचे प्रतिनिधी तसेच शिवशंभू भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या बैठकीत मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

# रविवारीही 'सिव्हिल'मध्ये रुग्णसेवा !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आरोग्यसेवा ही अत्यावश्यक सेवा आहे. यामुळे या शासकीय रुग्णालयात सलग दोन दिवस सुट्टी घेता येत नाही. यासाठी रविवारी ही छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालय सुरू होते. पण रुग्णांची संख्या कमी असल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी तीन रुग्णांची शस्त्रक्रिया केली. यात दोन हार्नियाचे रुग्ण असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दररोज बाराशे ते दीड हजार रुग्ण हे उपचारासाठी येत असतात. पण अनेक रुग्ण हे बाहेर जिल्ह्यातून आणि राज्यातून येत असतात. यामुळे दररोज ही संख्या दीड हजारपेक्षा जास्त पर्यंत जाते रविवारी रुग्णालयाला सुट्टी असल्याचे माहीत असते, पण १० तारखेला दुसरा शनिवार, दि. ११ तारखेला रविवार आणि १२ तारखेला बुद्ध पोर्णिमा असे सलग तीन दिवस सुट्ट्या आल्या. पण रुग्णसेवेत सलग दोन दिवस सुट्टी घेता येत नाही. यासाठी रविवारीही ओपीडी सुरू होती. पण रविवारची ओपीडी ही जेमतेम दीडशेपर्यंत असल्याचे पहायला मिळाले. दरम्यान, सकाळी अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी हॉस्पिटलची पाहणी केली.

हॉस्पिटलमध्ये सर्व कर्मचारी वेळेवर येतात का, रुग्णांना डॉक्टर आणि इतर कर्मचारी वेळेवर देखभाल करतात का याची पाहणी करण्यात येणार आहे. यासाठी मंगळवारपासून सात दिवस ही विशेष मोहीम घेतली जाणार आहे. यात काही त्रुटी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

**- डॉ. संजीव ठाकूर,** अधिष्ठाता

**ओपीडीची स्वच्छता**

नेहमी हॉस्पिटलमध्ये गर्दी असते. त्या मानाने रविवारी हॉस्पिटल सुरू असूनही गर्दी कमी होती. यामुळे ओपीडीची व इतर विभागांची कर्मचाऱ्यांनी स्वच्छता केली. खासदार प्रणिती शिंदे यांनी शनिवारी हॉस्पिटलला अचानक भेट देत हॉस्पिटल प्रशासनावर व स्वच्छतेवर नाराजी व्यक्त केली होती.

# स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका घेण्याचा सुप्रिम कोर्टाचा निर्णय

## राष्ट्रीय जिल्हा परिषद पंचायत समिती असोसिएशनच्या लढ्याला यश

**माढा (कटूसत्य वृत्त):-** स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचा सुप्रिम कोटार्ने नुकताच निर्णय देत तसा सरकारला आदेश दिले आहेत.

याकरिता राष्ट्रीय जिल्हा परिषद पंचायत समिती असोसिएशनने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लवकर घ्याव्यात यासाठी पाठपुरावा करुन लढा दिला होता. असोसिएशनच्या वतीने सुप्रिम कोर्टात वकिल देऊन प्रकरण दाखल केले होते. अखेर असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष कैलास गोरे यांच्यासह असोसिएशनच्या लढ्याला मोठं यश आले आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका मागील तीन ते चार वर्षांपासून रखडलेल्या होत्या. संघटनेच्या वतीने अनेक वेळा सर्व स्तरावर प्रयत्न चालू होते. गेली तीन वषार्पासून राज्य सरकार मधील मुख्यमंत्री यांच्यासह विविध मंत्री महोदयांसह निवडणूक आयोगाच्या अधिकायार्ना अनेक वेळा प्रत्यक्ष भेटून निवेदने देऊन पाठपुरावा सुरु होता.

मागील ३ ते ४ वर्षापासून स्थानीक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लांबणीवर गेल्या होत्या.यामुळे नगरपरिषद,जिल्हा परिषद,पंचायत समिती मध्ये कारभारीच नसल्याने विकास कामांना खिळ बसली होती.सरकार दरबारी मंत्र्याकडे तसेच निवडणुक आयोगाकडे निवडणुका घेण्यासंदर्भात आमचा पाठपुरावा सुरु होता.मात्र अखेर आम्ही संघटने मार्फत सुप्रिम कोटार्चा दरवाजा ठोठावला वकिल पत्र दाखल करुन विषय मांडला आणी यास यश देखील मिळाले.

**- कैलास गोरे,** संस्थापक अध्यक्ष असोसिएशन

तरी देखील निवडणुका घेणे बाबत दिरंगाई होत होती. 24 एप्रिल 2025 रोजी राष्ट्रीय पंचायत दिवसाचे औचित्य साधून संघटनेच्या वतीने ॲड. प्रशांत केंजळे यांना सुप्रीम कोर्टामध्ये संघटनेच्या वतीने वकिल पत्र देऊन सुप्रिम कोर्टात स्थानीक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्यासंदर्भात उभे करण्यात आले.

सुप्रीम कोर्टाने संघटनेची सविस्तर बाजू ऐकून घेत लोकशाही बळकट करण्यासाठी निवडणुका महत्त्वाच्या आहेत. चार महिन्याच्या आत निवडणुका घेण्याचे आदेश संघटनेने दाखल केलेल्या याचिकेवर देण्यात आले.

संघटनेच्या या लढ्याकरिता प्रामुख्याने संघटनेच्या वतीने अध्यक्ष कैलास गोरे पाटील,शरद बुट्टे पाटील, उदय बने, पांडुरंग पवार, प्रदीप कंद, निर्मलाताई पानसरे,प्रभाकर सोनवणे,जय मंगल जाधव,सरिता गाखरे,भारत शिंदे,आदींनी सातत्याने पाठपुरावा केला.

# सरसकट कर्जमाफी झाली नाही, तर छावाचा रणसंग्राम पेटणार - करण गायकर

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** छावा क्रांतिवीर सेनेचे ११वे महाधिवेशन महाराष्ट्रातील शेतकरी, कामगार, युवक आणि मराठा समाजाच्या न्यायासाठी ठरलेला एक निर्णायक टप्पा ठरला.या अधिवेशनासाठी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कामगार नेते अभिजीत राणे तर कार्यक्रमाचे उद्घाटक माजी राज्यमंत्री दर्जा रविकांत तुपकर यांच्या शुभहस्ते झाले.




या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून छावा क्रांतिवीर सेनेच्या ११व्या राज्यस्तरीय अधिवेशनास उपस्थित राहून मार्गदर्शन व आशीर्वाद दिल्याबद्दल खालील सर्व मान्यवरांचे आभारः

महामंडलेश्वर स्वामी शनिभक्त संत सुखदेव महाराज, भाजपा प्रवक्ते अजित चव्हाण, आमदार समाधान अवताडे,आमदार अभिजीत आबा पाटील, मराठा नेते गंगाधर नाना काळकुटे, शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठे, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष समाधान काळे, अक्कासाहेब मोहिते पाटील, यशराज साळुंखे पाटील, शहाजी साळुंखे, राजाभाऊ माने, शेतकरी नेते समाधान फाटे, नवनाथ माने, संतोष ननवरे व इतर मान्यवर.

तसेच छावा क्रांतीवीर सेनेचे सर्व विभागीय,जिल्हा व तालुका पदाधिकारी यांची उपस्थिती अधिवेशनाला यशस्वी करण्यात महत्त्वपूर्ण ठरली. संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो छावासैनिक उपस्थित राहिले आणि या अधिवेशनात एकमताने निश्चय करण्यात आला की,"शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसल्याशिवाय छावा क्रांतिवीर सेना आता शांत बसणार नाही!"

अध्यक्ष करण गायकर यांनी सरकारला थेट इशारा दिला की,"राज्यातील सर्व शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे!उपमुख्यमंत्री अजित पवार हे शेतकऱ्यांची चेष्टा करत आहेत,त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहेत. अशा शेतकरी विरोधी अजित पवारांचा तात्काळ राजीनामा घ्यावा.तसेच त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तंबी द्यावी की,शेतकरीबद्दल वादग्रस्त वक्तव्य अजिबात करू नये. अन्यथा छावा क्रांतिवीर सेना महाराष्ट्रभर रस्त्यावर उतरेल आणि हे आंदोलन केवळ निदर्शने न राहता राज्यकर्त्यांच्या झोप उडवेल.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे कर्जमाफी,पिक विमा या विषयांवर सातत्याने वादग्रस्त वक्तव्य करून शेतकरी बांधवांचे मन दुखवत आहेत आणि स्वतःला राज्याचे मालक समजत आहेत.ही मगरुरी आम्ही खपवून घेणार नाही.त्यांनी जर ही भूमिका सुरूच ठेवली,तर छावाच्या माध्यमातून प्रचंड मोठ्या प्रमाणात जनआंदोलन उभे केले जाईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास असून,तो फक्त शब्दांवर नव्हे तर कृतीवर आहे. आणि हा विश्वास हे दोघंही नक्कीच पूर्ण करतील."

हे अधिवेशन यशस्वी करण्यामध्ये प्रदेश कार्यकारणीतील खालील पदाधिकाऱ्यांची प्रमुख भूमिका होती त्यामध्ये प्रदेश महासचिव शिवाजी राजे मोरे, युवक प्रदेशाध्यक्ष शिवा तेलंग, केंद्रीय कार्याध्यक्ष विजय वाहूळे, प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत, प्रदेश संपर्कप्रमुख नितीन शिंदे, युवक प्रदेश सरचिटणीस नवनाथ शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष बाबा रोटे, उद्योजक आघाडी प्रदेशाध्यक्ष डॉ.किरण डोखे, प्रदेश संघटक दिनकर मामा कोतकर, प्रदेश मुख्य संघटक नितीन सातपुते, प्रदेश उपाध्यक्ष पांडुरंग मामा मोरे, प्रसिद्धी विभाग संपर्कप्रमुख वैभव दळवी, राज्य कार्यकारिणी सदस्य धनराज लटके, सागर कदम, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष मनोरमा ताई पाटील, महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष प्रगती ताई तिवारी, संगीताताई सूर्यवंशी, सविताताई वाघ, अश्विनीताई नरगुंदे.

उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष संदीप राऊत, मराठवाडा अध्यक्ष रामेश्वर बावणे,उत्तर महाराष्ट्र कामगार आघाडी अध्यक्ष प्रवीण पाटील,उत्तर महाराष्ट्र युवक अध्यक्ष दिनेश जाधव,कामगार आघाडी उपाध्यक्ष योगेश पाटील,युवा संघटक महाराष्ट्र राज्य अमोल शिंदे,शेतकरी आघाडी पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष हनुमंत तात्या डुबल,पश्चिम महाराष्ट्र युवक उपाध्यक्ष प्रफुल श्रीसागर,आयटी प्रदेश कार्याध्यक्ष रवी सातपुते, उमेश डरपे.

प्रमुख जिल्हा प्रमुख सोलापूरः दत्तात्रेय जगताप, नाशिकः आशिष हिरे, नवनाथ वैराळ,बीडःराहुल चाळक, नांदेडः बालाजी ढगे, सांगलीःदीपक मुळे, जालनाःराम पाटील गाडेकर, धाराशिवः श्याम पाटील, जळगावःमनोहर शिंदे.

सांस्कृतिक पर्यटन विभाग जिल्हा प्रमुख भारत पिंगळे,नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख आबा पाटील, शेतकरी आघाडी जिल्हा प्रमुख गोरख संत. वारकरी आघाडीचे जिल्हाप्रमुख दत्ता महाराज पवार अमोल देवरे

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेतकरी आघाडी प्रदेशाध्यक्ष गणेश माने यांनी केले तर आभार पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष हर्षद भोसले यांनी मानले.

संपूर्ण राज्य कार्यकारिणीचा भक्कम पाठिंबा!

या अधिवेशनात सर्व जिल्हा व विभागीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि एकच निर्धार केला.

"शेतकरी,कामगार,युवक व मराठा समाजासाठी लढायचं आणि विजय मिळवायचाच!"

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी सोलापूर जिल्हा प्रमुख दत्तात्रय भाऊ जगताप, योग जिल्हाप्रमुख मंगेश श्री सागर, महेश जाधव, संदीप झांबरे, नितीन थिटे, सागर कुरमुरे, प्रणव शिंदे, विशाल शहा, शुभम खेडकर, संदीप खेडकर, सौदागर कोल्हे, सिताराम पाटील आदींसह सर्व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

# उजनीसह महाराष्ट्रातील पाच धरणांमधील गाळ काढण्यासंदर्भात खा. उदयनराजे भोसले यांनी आवाज उठवावा

**टेंभुर्णी (प्रतिनिधी)-** महाराष्ट्रातील उजनी धरणासह पाच धरण क्षेत्रातील साचलेला गाळ काढण्याच्या प्रलंबित प्रश्न पावसाळी अधिवेशनात संसदेमध्ये मांडावा या संदभार्तील निवेदन खासदार उदयनराजे भोसले यांच्याकडे रयत क्रांती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुहास पाटील यांनी दिले.भिमानगर येथे माजी कृषी सभापती संजय पाटील यांच्या घरी सदिच्छा भेट देण्यासाठी खासदार उदयनराजे भोसले आले होते. यावेळी प्रा. पाटील यांनी निवेदन देऊन,उजनी धरणासह गिरणा (नाशिक), गोसीखुर्द (भंडारा), जायकवाडी (छत्रपती संभाजी नगर) आणि मुळा (अहिल्यानगर) या पाच धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात साचलेला गाळ काढण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. परंतु काही तांत्रिक कारणांमुळे निवीदा रखडलेले आहेत. या संदभार्तील प्रश्न येत्या पावसाळी अधिवेशनात संसदीय अधिवेशनात मांडण्यासंबंधीचा आग्रह खासदार उदयनराजे भोसले यांच्याकडे करण्यात आला.उजनी धरण १२३ टीएमसी पाणी क्षमतेचे आहे.परंतु त्यामध्ये गाळ मिश्रित वाळू आहे. दरवर्षी उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरले जाते. परंतु १५ मे नंतर एक महिना उजनी धरणातील आवर्तने बंद झाल्यानंतर शेतकऱ्यांची संपूर्ण पिके धोक्यात येतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सर्व पिकांचे खूप नुकसान होते.जर उजनी धरणातील २० टीएमसी गाळ निघाला तर चार पाण्याची आवर्तने उजनी धरणातून मिळू शकतात.तसेच उजनी धरणाच्या गाळ काढण्याविषयीचे सर्वेक्षण नाशिकच्या मेरी संस्थेने केले आहे. त्यांच्या सर्वेक्षणानुसार उजनी धरणामध्ये २० टीएमसी गाळ आहे. त्यामुळे पाणी क्षमता मोजमापानुसार पूर्णपणे भरली असली तरी, साचलेल्या गाळामुळे पाणी कमी येते. त्यामुळे नदी, कालवा व उपसा सिंचन योजनांचे आवर्तने सोडून सुद्धा उजनी धरणातील पाण्या संदर्भात जलसंकट तयार होते. व शेतीच्या अतोनात नुकसान होते.



गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही संकल्पना लवकरात लवकर राबविण्याविषयी माजी मंत्री तथा आमदार सदाभाऊ खोत यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना शिष्टमंडळ घेऊन भेटणार आहोत. महाराष्ट्रातील उजनी सह पाच धरणांमधील गाळ काढला तर शेती अधिक सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही.

**- प्रा.सुहास पाटील,** पक्ष प्रदेशाध्यक्ष रयत क्रांती संघटना

उजनीतील साचलेला गाळ काढण्याच्या निविदा प्रसिद्ध करून सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा.या गाळ मिश्रित वाळू मधून सरकारला हजारो कोटी रुपयांचा महसूलही मिळू शकेल.याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे.यावेळी रांजणीचे माजी सरपंच पांडुरंग माने,सोसायटीचे चेअरमन वसंत चौगुले, सुदाम देशमुख, परमेश्वर कदम,संतोष पानबुडे आदीजण उपस्थित होते.